## प्रकरण चौथे

## अठराशे सत्तावनचे भारतीय स्वातंत्र्यसमर

## प्रकरण चौथे

## अठराशे सत्तावनचे भारतीय स्वातंत्र्यसमर

### (१) १८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर - सावरकरांची भूमिका आणि विश्लेषण :

स्वा. सावरकरांचे अंतिम ध्येय भारताचे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळविणे हे होते. त्यासाठी त्यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या मते राष्ट्रीय स्वातंत्र्य भिक्षा मागून वा नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गाने मिळणार नाही. त्यासाठी सशस्त्र क्रांतीचाच मार्ग स्वीकारला पाहिजे. म्हणून त्यांनी "अभिनव भारत" ही क्रांतीकारी संस्था स्थापन करून स्वातंत्र्यासाठी क्रांतीकारी विचारांचा प्रसार केला. लंडनला उच्च शिक्षणासाठी गेल्यानंतरही त्यांनी तेथे शिक्षणासाठी आलेल्या भारतीय तरूणांना संघटीत करून त्यांच्या मनात स्वातंत्र्यासाठी क्रांतीची भावना निर्माण करण्यासाठी "फ्री इंडिया हाऊस" ची स्थापना केली. या संस्थेच्या बैठकीतील भाषणात स्वदेश स्वातंत्र्यासाठी आपल्या सहका-यांना मार्गदर्शन करताना इटालियन स्वातंत्र्याचा प्रणेता मॅझिनी, त्याचे चरित्र व कार्य, १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दातील शूर वीर इत्यादींची प्रेरणादायक चरित्रे सांगून सध्या भारताला इंग्रजांच्या दास्यातून मुक्त करण्यासाठी सशस्त्र क्रांतीच केली पाहिजे. असे क्रांतीकारी विचार ते मांडीत. मॅझिनीने इटलीच्या स्वातंत्र्यासाठी "तरूण इटली" ही क्रांतीकारी संस्था स्थापन केली. तिच्याद्वारे देशातील लोकांची स्वदेशी सैनिकांची मने क्रांतीच्या विचाराने चेतवून ऑस्ट्रियाविरूध्द सशस्त्र क्रांती केली आणि इटलीचे स्वातंत्र्य मिळविले. त्याप्रमाणेच आपणही आपल्या देशात क्रांतीकारक संघटना उभारून तिच्याद्वारे लोकांत व स्वदेशी सैनिकांत क्रांतीचे विचार प्रज्वलीत करावे आणि

इंग्रजांविरुध्द क्रांतीयुध्द करुन देशाचे स्वातंत्र्य मिळविले पाहिजे, असे क्रांतीकारी विचार ते मांडीत.

परंतु सावरकरांचे हे निर्धाराचे क्रांतीकारी विचार त्यांच्या काही सहका-यांना एकदम पटत नसत. ते सावरकरांना विचारीत की, इटली आणि भारत यांची तुलना आपण कशी करता ? इटली हा युरोपातील एक प्रगत देश होता. त्याच्या भोवतीचे सर्व देश स्वतंत्र असल्याने इटलीतही स्वातंत्र्याचे वारे वाहत होते. तेथे असलेल्या लहान लहान संस्थानातून त्यांची स्वतंत्र सैन्ये होती, तसेच त्या सैन्याच्या हाती थोडीबहुत प्रगत अशी शस्त्रे होती. तो देश स्वातंत्र्योत्सुकही होता, म्हणून तेथील मॅझिनी, ग्यारिबाल्डी, काव्हूर इत्यादींचे स्वातंत्र्याचे प्रयत्न यशस्वी झाले. परंतु भारतात इटलीप्रमाणे स्वातंत्र्यासाठी शस्त्रे आहेत कोठे ? इंग्रजांच्या तोफा आणि बंदुकापुढे आपला निभाव लागणार कसा ? भारतात इंग्रजांच्या हाती जे भारतीय सैन्य आहे ते भाडोत्री, अशिक्षित आणि इंग्रजनिष्ठ असल्याने इंग्रजांविरुध्द युध्द करणे अशक्य आहे. त्यामुळे भारत इंग्रजांविरुध्द क्रांती कसा करु शकेल ? यावर सावरकर आत्मविश्वासाने आपली भूमिका मांडीत की, इंग्रजांच्या हाताखाली असलेल्या हया आपल्या भारतीय सैनिकांच्या हाती जी शस्त्रे आहेत ती आपलीच आहेत. ते सैनिक अशिक्षित असले तरी त्यांच्याही मनांत स्वातंत्र्याची भावना असलीच पाहिजे. ती त्यांच्या मनांत असलेली स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करा आणि मग पहा त्या परकीय इंग्रजांवरच तीच शस्त्रे कशी उलटतील, अशी क्रांतीची ठाम भूमिका मांडून आपल्या सहका-यात क्रांतीची चेतना निर्माण करीत. सावरकरांच्या मते, १८५७ च्या स्वातंत्र्य लढयात भारतीय सैनिकांनी आपले शस्त्र इंग्रजांच्याविरुध्द उभारले होते. इंग्रज त्यांना शिपायांचे बंड म्हणत असले तरी ते स्वातंत्र्यसमर होते. [१]

क्रांतीचे प्रत्यक्ष उदाहरण - १८५७ चे स्वातंत्र्यसमर :

स्वा. सावरकरांनी आपली क्रांतीची भूमिका हिंदी लोकांत, स्वदेश सैनिकांत रुजविण्यासाठी व वरील आक्षेपांना उत्तर देण्यासाठी पन्नास वर्षां-पूर्वी प्रत्यक्ष घडलेले १८५७ चे स्वातंत्र्यसमराचे प्रत्यक्ष उदाहरण दिले. ते उदाहरण देताना सावरकर म्हणतात की, "१८५७ चे स्वातंत्र्यसमर म्हणजे सर्व भारतीयांनी स्वधर्म व स्वराज्य यांच्या रक्षणासाठी इंग्रजसत्तेविरुद्ध केलेली स्वातंत्र्याची महान क्रांती होय." तेव्हा राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी १९५७ च्या स्वातंत्र्य समराप्रमाणेच भारतीयांनी पुन्हा अन्यायी इंग्रजांविरुद्ध सशास्त्र क्रांती करावी आणि स्वदेशाला स्वतंत्र करावे अशी क्रांतीकारी भूमिका त्यांनी मांडली. एकोणिसशे सात साली त्या स्वातंत्र्यसमराला प पन्नास वर्षे पूर्ण होणार होती. या काळात भारतात राजकीय असंतोषाची लाट देशभर पसरत चालली होती. त्या स्वातंत्र्यसमराची स्मृती जागृत करण्यास हा स्फोटक काळ अनुकुल आहे हे ओळखून, भारतीयांनी १८५७ च्या क्रांतीप्रमाणेच पुन्हा क्रांती करावी या भूमिकेतून सावरकरांनी १८५७ चे स्वातंत्र्यसमर हा स्फूर्तीस्पद विचारांचा ग्रंथ लिहिण्याचे ठरविले आणि त्या कार्यास प्रत्यक्ष सुरुवात केली.

ग्रंथाचा प्रभाव :

१८५७ चे स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ १९०८ साली लिहून पूर्ण झाल्यानंतर सावरकरांनी भारतात पाठविला. या काळात भारतात इंग्रजी राजवटी विरोधी वातावरण निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत या ग्रंथा-तील स्वधर्म व स्वराज्य रक्षणाच्या राष्ट्रवादी विचारांची प्रेरणा घेऊन १९०९ मध्ये भारतास इंग्रजांविरुद्ध छोटया मोठया राजकीय चळवळी घडून

आल्या. तसेच १९१५ मध्ये लाला हरदयाळ यांनी या ग्रंथाच्या अनेक प्रती काढून इंग्रजांविरुध्द भारतीयात असंतोष पसरविला. १९४२ मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी लोकांत राष्ट्रवादी विचार रूजावेत आणि त्यांनी इंग्रजांविरुध्द क्रांती करावी म्हणून या ग्रंथाच्या अनेक प्रती काढल्या. तसेच त्यांनी आपल्या आझाद हिंद फौजेची घोषणा "चलो दिल्ली" ही १८५७ च्या स्वातंत्र्य समरातीलच दिली आहे. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यासाठी या ग्रंथातील विचाराचा प्रभाव भारतीयांवर पडलेला दिसून येतो.

क्रांतीयुध्दाची प्रधान तत्वे : स्वधर्म आणि स्वराज्य -

अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराबाबत आपली भूमिका मांडताना सावरकर लिहितात की, क्रांतीचा इतिहास लिहिताना तिच्या पाठीमागील हेतू आणि क्रांती घडविणाऱ्या लोकांच्या मनातील भावना इत्यादींचा विचार करून, त्या क्रांतीत घडलेल्या घटनांचे मूल्यमापन करणे आवश्यक ठरते. परंतु या शास्त्रीय भूमिकेला धरून एकाही देशी वा विदेशी इतिहासकारांनी १८५७ च्या प्रचंड क्रांतीचा इतिहास लिहिलेला नाही. म्हणून ज्यांना सत्य, नि:पक्षपाती व मार्मिक इतिहास लिहावयाचा असेल त्यांनी त्या प्रसंगाची व क्रांतीची उभारणी कोणत्या पायावर झाली आहे, त्याच्या मुळाशी कोणते तत्व होते व त्याची प्रमुख कारणे कोणती होती योंचे विवेचन अवश्य केले पाहिजे, तेव्हाच ती क्रांती इतिहासाच्या नजरेस येते. परंतु १८५७ च्या प्रचंड राज्यक्रांतीचा इतिहास अशा शास्त्रीय पध्दतीने कोणाशी देशीवा विदेशीइतिहासकाराने लिहिलेला नाही. त्यामुळे या महान क्रांतीबाबत लोकांत विलक्षण, भ्रामक व दुष्ट समजुती निर्माण झालेल्या आहेत. तेव्हा हे सर्व दोष त्या क्रांतीयुध्दाच्या भाडोत्री

इंग्रजी लेखकांनी केलेले आहेत. काही लेखकांनी त्या युध्दाचे केवळ वर्णन देण्यापलिकडे काहीच केले नाही. बहुतेकांनी या युध्दाचा इतिहास दुष्ट व पक्षपातीवृत्तीने लिहिलेला आहे. त्यांच्या दूषित दृष्टीला या क्रांती-युध्दाची प्रधान तत्वे दिसलीच नाहीत. [२]

१८५७ च्या क्रांतीयुध्दाबाबत आपली भूमिका विशद करताना सावरकर लिहितात की, एखाद्या लहानशा खेडयातला बाजारही विशिष्ट हेतू असल्याशिवाय भरत नाही. मग ज्या बाजाराची दुकाने पेशावर-पासून कलकत्त्यापर्यंत पसरलेल्या रणभूमीवर हाराने थाटून राहिली होती. जेथे राज्ये आणि साम्राज्ये यांचा विक्का मांडला होता व जेथील चलनी नाणे हे केवळ रक्तच होते, तो प्रचंड बाजार उगीचच काही कारणाशिवाय भरला आणि मोडला, हे शक्य तरी आहे का ? ते पुढे लिहितात की, १८५७ ची महानक्रांती ही विशिष्ट हेतूशिवाय घडणे शक्य नाही. पेशावर पासून कलकत्त्यापर्यंत जी क्रांतीची लाट उसळली ती विशिष्ट हेतूशिवाय उठणे शक्य नाही. दिल्लीला पडलेले वेढे, कानपूरला झालेल्या कत्तली, साम्राज्याचे उभारलेले ध्वज व त्या ध्वजाखाली लढत लढत पडलेल्या शूरांच्या उडया ह्यासारखी उदात्त व स्फूर्तीदायक कृत्ये ही उदात्त व स्फूर्तीदायक साध्याशिवाय घडणे शक्य नाही. परंतु या मुद्दयाकडे इंग्रजी इतिहास-कारांनी मुद्दाम दुर्लक्ष करुन १८५७ च्या क्रांतीयुध्दाचे कारण काडतूसांची कंडी (चरबी) हे दिले. इंग्रजी इतिहासावर व इंग्रजांच्या लाचलुचपतीवर वाढलेले एक देशी इतिहासकार लिहितात की, काडतूसास गाईची व डुकराची चरबी लावतात हे ऐकूनच मूर्ख लोक बिथरले. ऐकलेली गोष्ट खरी की खोटी आहे याचा कोणीच शोध घेतला नाही. एक बोलला म्हणून दुसरा बोलला आणि दुसरा बिघडला म्हणून तिसरा बिघडला. अशी अंधपरंपरा चालून अविचारी मूर्खांचा समाज जमला आणि हे बंड घडून आले.अशा प्रकारे या

ग्रंथकाराने या क्रांतीचा चुकीचा इतिहास लिहिला आहे. त्याने या क्रांतीच्या मूळ तत्त्वांचा शोधच घेतला नाही.

चरबी लावलेली काडतूसे हेच या क्रांतीमागील खरे मुख्य कारण आहे, असे अट्टाहासाने सांगण्याचा प्रयत्न इंग्रजी इतिहासकारांनी आणि त्यांच्या लाळ-घोटया हिंदी लेखकांनी केलेला आढळतो. आता केवळ काडतूसांमुळे क्रांती घडली म्हणावी तर मग श्रीमंत नानासाहेब,झाशीची राणी लक्ष्मीबाई, दिल्लीचा बादशाहा इत्यादी क्रांतीनेते तिला कसे मिळाले ? यांना इंग्रज लष्करात नोकरी करावयाची नव्हती. किंवा घरी बसले तरी काडतूसे तोडलीच पाहिजेत अशी सक्ती त्यांच्यावर कोणीही केलेली नव्हती. तरी देखील त्यांनी या क्रांतीत का भाग घेतला ? बरे, पुढे गव्हर्नर जनरलने ती बंद करण्याचे आश्वासन दिल्या-नंतरही सैन्यातील नोकरीलाच रामराम ठोकण्याचे सोडून हिंदी शिपाई एकदम इंग्रज सत्तेशी लढाईचे आव्हान देऊन का उठले ? शिपाईच काय पण सैन्यांशी ज्यांचा काहीही संबंध नाही असे लक्षावधी शांतताप्रिय हिंदी नागरिक, राजे आणि महाराजे उठले, आणि आपले प्राण खर्च करण्यासाठी प्रत्यक्ष रणांगणावर लढले. त्यामुळे ही क्रांती काडतूसांच्या चरबीमुळे घडून आली नाही. तर स्वधर्म रक्षणाच्या तत्वामुळे घडून आली अशी क्रांतीची भूमिका सावरकरांनी मांडली.

सावरकरांच्या मते, अयोध्या राज्य खालसा करण्यात आले म्हणून सत्तावनची क्रांती घडून आली. हे क्रांतीचे दुसरे मत बरोबर नाही. कारण या क्रांतीत अयोध्या राज्याशी ज्यांचा काहीही संबंध नाही अशा कितीतरी हिंदी लोकांनी भाग घेऊन आपले प्राण खर्च केले आहेत. तसे असते तर या लोकांनी या क्रांतीत भाग घेतला नसता. त्यामुळे अयोध्या राज्य खालसा

केल्याने ही क्रांती घडून आली नाही तर अयोध्या राज्य खालसा करण्यात ज्या तत्वाचा (स्वराज्य रक्षण) इंग्रजांनी उपमर्द केला, त्या तत्वामुळे ही क्रांती घडून आली आहे. अशी आपली भूमिका त्यांनी मांडली.

त्यांच्या मते, काडतूसांची चरबी आणि अयोध्या राज्य खालसा करणे ही या क्रांतीची नैमित्तिक कारणे आहेत तेव्हा या नैमितिक कारणांच्या मागच्या मूळ तत्वांचा शोध घेतला तर असे दिसून येते की, १८५७ ची महान क्रांती ही स्वधर्म आणि स्वराज्य या दोन प्रमुख तत्वांच्या रक्षणासाठी भारतीयांनी घडवून आणली होती. कारण एका कृत्यातून दुस-या अनेक कृत्यांचा जन्म होणार हे भारतीयांनी जाणले. काडतूसांच्या चरबीप्रमाणेच इतर अनेक कृत्ये करून इंग्रज लोक आपला स्वधर्म बुडविण्याचा प्रयत्न करणार, तसेच अयोध्या राज्याप्रमाणेच देशातील इतर राज्ये खालसा करणार. त्यामुळे आपला स्वधर्म व स्वराज्य नष्ट होणार अशी भावना हिंदी लोकांची, शिपायांची व संस्थानिकांची बनल्यामुळे या सर्वांनी मिळून स्वधर्म व स्वराज्य या दोन प्रमुख तत्वांच्या रक्षणासाठी १८५७ मध्ये इंग्रजांविरूध्द ही महान क्रांती घडवून आणली. स्वराज्य व स्वधर्मासाठी भारताने कोणते प्रयत्न केलेले नाहीत ? स्वधर्म व स्वराज्यासाठी रणांगणावर तिळतीळ तुकडे झाले तरी जे हरत नाहीत अशा प्रसंगांनी भरलेला भारतभूमीचा इतिहास आहे. या क्रांतीच्या काळात दिल्लीच्या बादशाहांनी काढलेल्या स्वराज्य संस्थापनेच्या जाहिरनाम्यात ते म्हणतात, हिंदवासीयांनो, जर आपण सर्वजण मनात आणू, तर शत्रूंचा क्षणार्धात धुव्वा उडवून देऊ व आपल्या प्राणप्रिय धर्माला व देशाला पूर्ण भयमुक्त करू. ह्या वाक्यात असलेल्या दिव्य तत्वांसाठी जी क्रांती होते, आपल्या प्राणप्रिय धर्माला व देशाला बंधमुक्त करण्यासाठी जे क्रांतीयुध्द होते त्या क्रांतीयुध्दाहून पवित्र असे जगात दुसरे काहीही नाही.

"स्वराज्य रक्षण, स्वराज्य संस्थापन व स्वधर्म - परित्राण यांसाठी दिल्लीच्या सिंहासनावरून प्रार्थना केलेल्या या स्पष्ट व स्फूर्तीजनक मंत्रातच १८५७ च्या क्रांतीचे बीज आहे." बरेलीला छापून प्रसिध्द केलेल्या व अयोध्येच्या नबाबांनी काटलेल्या दुसऱ्या एका जाहीरनाम्यात ते म्हणतात, "भारतातील सर्व हिंदु व मुसलमानांनो, उठा ! स्वदेश बांधवहो, परमेश्वराने दिलेल्या देणग्यात अत्यंत श्रेष्ठ देणगी म्हणजे स्वराज्य ही होय. ही ईश्वरदत्त देणगी ज्याने आपल्यापासून फसवून, हिसकावून नेली आहे, त्या जुलमी राक्षसाला ती फार दिवस पचणार नाही. हे ईश्वरी इच्छेविरूध्द असलेले कृत्य फार दिवस नयास जाणार नाही. इंग्रजांनी इतके जुलूम केलेले आहेत की, त्यांच्या पापाचे घडे पूर्वीच तुडुंब भरलेले आहेत. अशातच आता आपल्या पवित्र धर्माचा नाश करण्याची त्यांना दुर्बुध्दी (कुबुध्दी) सुचली आहे. तेव्हा आता तुम्ही स्वस्थ बसावे अशी परमेश्वराची इच्छा नाही. कारण सर्व हिंदु-मुस्लीम बांधवांच्या ह्रदयात त्याच्याच इच्छेने या इंग्रजांना आपल्या देशातून हाकलून देण्याची बुध्दी उत्पन्न झालेली आहे, परमेश्वराच्या इच्छेने व तुमच्या पराक्रमाने लवकरच त्यांचा पूर्ण नायनाट होईल, सर्व क्षुल्लक भेद विसरून जाऊन ह्या सैन्यात सर्वत्र समताच नांदली पाहिजे. कारण जे जे पवित्र धर्मयुध्दात स्वधर्मासाठी आपली तलवार उपसतात ते सर्व सारख्याच योग्यतेचे आहेत. ते बंधूवध आहेत. त्यांच्यात मुळीच भेद नाही म्हणून पुन्हा एकदा मी सर्व हिंदी बंधूस म्हणतो की, उठा व या परमेश्वरी व दिव्य कर्तव्यासाठी रणांगणात उडी घ्या."[3]

सावरकरांच्या मते, स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी भारतीयांनी अनेक वेळा क्रांत्या घडवून आणल्या आहेत. त्यामुळे स्वधर्म व स्वराज्य रक्षण ही तत्वरत्ने पाहून, ज्याला १८५७ च्या क्रांतीयुध्दाबद्दल प्रेम वाटत नसेल तर तो मंद असला पाहिजे किंवा भामटा तरी असला पाहिजे. म्हणूनच ईश्वरदत्त हक्कांसाठी लढणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. हे ओळखूनच आपल्या स्वधर्म

व स्वराज्य रक्षणासाठी त्या क्रांतीयुध्दात अनेक हिंदी शूरांनी इंग्रजा-विरूध्द आपल्या तलवारी उपसल्या हे सिध्द करण्यास आणखी दुसरा कोणता सबळ पुरावा पाहिजे ? सावरकर पुढे लिहितात, "स्वधर्म व स्वराज्य ही दोन्ही तत्वे परस्पर विरोधी नाहीत, तर ती परस्परांशी एकरूप आहेत. स्वधर्माची कल्पना ही स्वराज्याहून भिन्न नाही. स्वधर्माशिवाय स्वराज्य तुच्छ असते व स्वराज्याशिवाय स्वधर्म बलहीन असतो. म्हणून भारताच्या इतिहासात आजपर्यंत अखंडत्वाने व्यक्त होत आलेले हे स्वधर्म व स्वराज्याचे तत्व या १८५७ च्या क्रांतीयुध्दात व्यक्त झालेले आहे."

त्यांच्या मते, परमेश्वराचीच आज्ञा आहे की, स्वधर्म रक्षणासाठी स्वराज्य संपादन करा. कारण स्वराज्य हे स्वधर्म रक्षणाचे साधन आहे. जो स्वराज्य संपादन करीत नाही, तो गुलामगिरीत जाऊन पडतो, तसेच तो अधर्मी व धर्मद्रोही ठरतो. म्हणून "स्वधर्मासाठी उठा व स्वराज्य संपादन करा." श्री समर्थ रामदासांनी अडीचशे वर्षापूर्वी हाच मंत्र राष्ट्र दिला, की, "धर्माकरिता मरावे । मरोनि अवघ्यासि मारावे ।

मारितां मारितां घ्यावें । राज्य आपुलें ।। "

त्यामुळे सावरकरांच्या मते १८५७ च्या महान क्रांतीमागे हेच तत्व होते. ४

१८५७ च्या या महान क्रांतीमागे हिंदी लोकांची स्वधर्म आणि स्वराज्य संरक्षणाची तीव्र इच्छा होती. कारण त्या काळात भारतात ख्रिश्चन मिशन-यांची धर्म वाटवा बाटवी चालली होती. त्यामुळे इंग्रजांच्या राज्यात आपला धर्म सुरक्षित राहणार नाही असे हिंदु व मुसलमान देश-बांधवाचे मत झाले.

(२) अ) १८५७ च्या स्वातंत्र्ययुध्दाची कारण परंपरा :

स्वा. सावरकरांच्या मते, स्वधर्म व स्वराज्य या दोन प्रमुख तत्वांच्या रक्षणासाठी सुरु झालेल्या या स्वातंत्र्य युध्दाचा आरंभ, ज्या क्षणी भारताच्या किना-याला इंग्रजांच्या पारतंत्र्याचा पाय लागला त्याक्षणीच झाला. भारतीयांना स्वातंत्र्याच्या ऐवजी गुलामगिरी व स्वधर्माच्या ऐवजी ख्रिश्चानिटी देण्याचे पापी विचार जेव्हा इंग्रज व्यापा-यांच्या मनांत आले तेव्हाच भारतभूमीच्या अंत:करणात क्रांतीची बीजे पेरली गेली. १८५७ च्या क्रांतीयुध्दाचे कारण इंग्रजी सत्तेच्या जुलमी व अन्यायी अमंलातच आहे. ज्या-वेळी इंग्रज लोक हे भारतात गुलामगिरी लादण्यासाठी एखाद्या राक्षसाप्रमाणे धावून आले त्याच दिवशी या क्रांतीयुध्दाचे बीज पेरले गेले आणि त्यातूनच १८५७ मध्ये स्वधर्म व स्वराज्य रक्षणाची महान क्रांती घडून आली.

मॅझिनी म्हणतो, स्वातंत्र्य हा प्रत्येकाचा निसर्गदत्त हक्क आहे व म्हणून या पवित्र हक्काचा अपहार करुन इच्छिणा-या जुलुमाचा उच्छेद करणे हे प्रत्येकाचे निसर्गसिध्द कर्तव्य आहे. व्यक्तीची, राष्ट्राची व मानवजातीची प्रगती होण्यासाठी त्यांच्यात चैतन्य पाहिजे. परंतु जेथे स्वतंत्रता नसते तेथे चैतन्य असणे शक्य नाही. जो लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतो तो अक्षम्य पाप करतो. इतकेच नव्हे तर, नकळत सर्व मानवजातीच्या व स्वत:च्याच मानेवर कु-हाड मारुन घेऊन आत्महत्येच्या भयंकर पापाचाही धनी होतो.ही पापे करुन आजपर्यंत कोणीही तरला नाही. ही गुलामगिरीची बेडी पर-मेश्वराच्या इच्छेविरुध्द आपल्या मानवी बंधूच्या पायांत अडकवून आजपर्यंत कोणाचाही पक्ष जयाला गेला नाही. स्वतंत्रतेच्या व गुलामगिरीच्या संघर्षात शेवटी स्वतंत्रतेचाच विजय ठरलेला असतो. त्यामुळे सावरकरांच्या मते, भारतीयांना स्वत:चे स्वातंत्र्य संपादन करण्याच्या या क्रांतीयुध्दाला इतर

गोष्टीपेक्षा इंग्रजांचीच जास्त मदत झाली. कारण त्यांनी या संकल्पीत क्रांतीयुध्दाची बीजे भारतात आल्यापासून आपल्या अन्यायी राजवटीद्वारे अनेक ठिकाणी पेरली. वॉरन हेस्टिंग्जने काशी, रोहिलखंड व बंगालमध्ये पेरली, तर लॉर्ड वेलस्लीने म्हैसूर, वसई, पुणे, सातारा व उत्तर भारताच्या सुपीक प्रदेशात पेरली. वचन भंग, अविश्वास, विश्वासघात, जुलूम इत्यादी मार्गांचा अवलंब करुन इंग्रजांनी भारतातील संस्थाने नष्ट केली. त्यामुळे भारताला या परतंत्र बनविण्याच्या इंग्रजांच्या प्रयत्नातच अठराशे सत्तावन-च्या महान क्रांतीची बीजे आहेत. तसेच ज्यांच्या मदतीने इंग्रजांच्यासाठी सर्व भारत जिंकला त्या हिंदी सैनिकांना त्यांनी अत्यंत क्रूरतेने वागवणूक दिली. त्यामुळे या सैनिकांत इंग्रजांबाबत असंतोष निर्माण झाला व या संकल्पीत क्रांतीची बीजे पेरली गेली.

अशा प्रकारे १८४८ पर्यंत भारतात आलेल्या सर्व इंग्रज गव्हर्नरांनी आपल्या अन्यायी राजवटीने भारताला परतंत्र करण्याचा प्रयत्नातूनच या संकल्पीत महान क्रांतीची बीजे पेरली.

अशाच परिस्थितीत या सर्व गव्हर्नरांना मागे टाकणारा गव्हर्नर लॉर्ड डलहौसी १८४८ मध्ये भारतात आला. निसर्ग सुंदर भारतभूमीला आपली बटीक बटविणे हा त्याचा अंतिम उद्देश होता. त्यामुळे या दुर्योधनाला नीति-अनीति यांची फिकीर नव्हती. आपली पापी वासना पूर्ण करण्यासाठी त्याने मिळेल त्या साधनांचा वापर करण्याचे ठरविले. [५]

या साधनापैकी पहिले साधन म्हणजे त्याची पंजाबशी झालेली लढाई होय. डलहौसी भारतात येताच त्याच्या लक्षात आले की, पंजाब-

मध्ये जोपर्यंत शिखांचे स्वतंत्र राज्य आहे, तोपर्यंत आपली पापी वासना पूर्ण करणे हे इंग्लंडला फार जड जाणारे आहे. म्हणून त्याने या राज्यावर आक्रमण करून शिखांचे राज्य जिंकून घेतले. ह्या घटनेमुळे हिमा-लयापासून ते कन्याकुमारीपर्यंत भारताच्या मानचित्रावर सगळीकडे ब्रिटिशांचा तांबडा रंग फासला गेला. त्यानंतर भारताची भूमी सपाट करण्यासाठी आलेल्या या डलहौसीचे लक्ष सातारच्या गादीकडे गेले. इ.स. १८४८ साल-च्या एप्रिल महिन्यात सातारचे शेवटचे महाराज अप्पासाहेब वारले. ही बातमी डलहौसीला समजताच त्याने सातारच्या हिंदुपद पादशाहीचे धडे आपले डोके उंच करू पाहिल म्हणून "दत्तक वारस नामंजूर" या तत्वानुसार हे राज्य खालसा केले. तर नागपूरच्या भोसले राजांनी दत्तक पुत्र घेतलाच नाही म्हणून ते राज्य खालसा केले. बाजीरावाच्या मृत्यूनंतर दत्तकपुत्र श्रीमंत नानासाहेब पेशवे यांची पेन्शन जप्त केली. या कृतीने नानासाहेबांचे मन दु:खविले गेले. १८५३ मध्ये राणी लक्ष्मीबाईचा पती वारताच त्यांनी दत्तक घेतलेला तिचा प्रिय पुत्र दामोदर याला वारसदारीचे हक्क न देता झाशीचे संस्थान खालसा केले. परंतु कागदोपत्री खालसा होणारे हे संस्थान नव्हते. त्या संस्थानावर महाराणी लक्ष्मीबाई राज्य करीत होती. ती अशा खालसाकरणाला दाद देणारी नव्हती. इंग्रजांची ही कुटिल करणी पाहताच ती झाशीची राणी कडाडली की, "मेरी झाशी मै नही दूंगी। मेरी झांशी मैं दूंगी नही ।" ज्याची हिम्मत असेल त्याने ती घेऊन पहावी, असे म्हणून तिने या संकल्पीत क्रांतीयुध्दाची तयारी केली. त्यानंतर डल-हौसीने अयोध्येचा सुपीक प्रदेश आपल्या ताब्यात आणण्यासाठी अकार्यक्षमतेचे कारण देऊन हे राज्य खालसा केले. या प्रमाणेच वेगवेगळी कारणे देऊन डलहौसीने अर्काट, तंजावर, अंगूल, सिक्कीम, संबळपूर, खैरपूर, कर्नाटक इत्यादी राज्ये खालसा केली. अशा प्रकारे डलहौसीने नीति-अनीति यांचा विचार न करता भारताची भूमी सपाट करण्यासाठी देशातील बहुतेक संस्थाने

खालसा करून भारताच्या पायात गुलामगिरीची बेडी ठोकली. त्यामुळे स्वराज्य रक्षणासाठी या संस्थानातील सर्व राजे महाराजांनी १८५७ च्या संकल्पीत क्रांतीची तयारी केली आणि यातूनच ही क्रांती घडून आली. [६]

सावरकरांच्या मते, जगातील कोणत्याही धर्मात पारतंत्र्य व गुलामगिरी यांचे समर्थन केलेले नाही. परमेश्वर जेथे असतो तेथे पारतंत्र्य नसते. व जेथे पारतंत्र्य असते तेथे परमेश्वराचे अधिष्ठान नसते. त्यामुळे जेथे परमेश्वराचे अधिष्ठान नसते तेथे धर्म नसतो. म्हणून कोणत्याही प्रकारचे पारतंत्र्य म्हणजे धर्माचा उच्छेद व परमेश्वरी इच्छेचा भंग होय. राजकीय पारतंत्र्याने मानव-जातीची भयंकर हानी होते. म्हणून पारतंत्र्याच्या या अधम राक्षसाचा शिरच्छेद करावा अशी धर्माची आज्ञा आहे. जे इतरांना परतंत्र करतात व जे पारतंत्र्यात राहतात ते दोघेही मानवजातीला नरकात ढकलत असतात. वास्त-विक सर्वच धर्म मानवजातीला स्वर्गाकडे नेण्यासाठी राजकीय पारतंत्र्याचा नि नि:पात करा असा उपदेश करतात. धर्माची ही आज्ञा मोडणारे लोक धर्मद्रोही असतात. त्यामुळे लोकांना पारतंत्र्यात ढकलणारे इंग्रज रोज चर्चमध्ये जात असले तरी ते धर्मद्रोहीच आहेत. पारतंत्र्यात असणारे हिंदी लोक रोज अंगाला राख लावीत असले तरी ते धर्मद्रोहीच होत. राजकीय पारतंत्र्यात राहणारे सर्व हिंदु-मुसलमान धर्मभ्रष्टच होत, मग ते रोज हजार वेळा संध्या करोत किंवा हजार वेळा नमाज पढोत. हे लक्षात घेऊनच श्रीसमर्थ रामदासांनी स्वराज्य प्राप्ती हे धर्माचे प्रमुख कर्तव्य आहे असे सांगितले होते. जे राज्य आपल्या संमतीशिवाय शक्तीने आपल्यावर चालविलेले असते असे परराज्य फेकून देणे, गुलामगिरीच्या बेडया तोडणे, स्वराज्य मिळविणे व स्वातंत्र्य मिळविणे हे धर्माचे प्रमुख कर्तव्य आहे. समर्थांचा हाच उपदेश दोन शतकानंतर भारती-यांच्या कानांत ज्ञात व अज्ञात स्वाने अठराशे सत्तावन साली पुन्हा गुणगुणु लागला व त्यातूनच स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी १८५७ ची महान क्रांती घडून आली. [७]

भारताचे स्वराज्य घेऊन देशातील सर्व धर्मांना इंग्रजांनी पायदळी तुडविले, परंतु धर्माचा हा तात्वीक उपमर्द पुरेसा न वाटल्याने त्यांनी व्यावहारिक उपमर्द करण्याची तयारी सुरू केली. आफ्रिका व अमेरिकेतील लो लोकांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा देण्यात यश आल्याने आपण भारतीयांना ख्रिस्तीमय करू असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी भारताला ख्रिस्तीमय करण्यासाठी राजरोसपणे प्रयत्न सुरू केले. शिक्षणाच्या माध्यमातून मिशनरी मुलांना ख्रिस्ती धर्माची शिकवण देऊ लागले. अधिकारी आपल्या हाताखालच्या हिंदी लोकांना ख्रिस्ती धर्माचा उपदेश करू लागले. अधिकाराच्या जोरावर हिंदी धर्माची पायमल्ली करण्यासाठी इंग्रज लोक सैन्यात प्रवेश करू लागले आणि शांततेच्या काळात हिंदुमुस्लीम सैनिकांना ख्रिस्ती धर्माचा उपदेश करू लागले. अधिकाराच्या जोरावर हे कर्नल अधिकारी हिंदु मुस्लीम बांधवाच्या देवदेवतांना शिव्या देऊ लागले, उठता बसता त्यांच्या प्राणप्रिय वेदांची व कुराणाची निंदा करू लागले. तसेच जो सैनिक ख्रिस्ती धर्म स्वीकारील त्याला बढती देऊ लागले. त्यामुळे लष्करी खाते हे ख्रिस्तीनिटीच्या बळजोरीचे मिशनच बनले. तसेच ख्रिस्ती मिशनरी अनेक मार्गांनी भारतात धर्मांतर घडवून आणू लागले. त्यामुळे संपूर्ण भारताला ख्रिस्तमय करण्याचा इंग्रजांचा हा कुटिल हेतू भारतीयांच्या लक्षात येताच देशातील सर्व हिंदु - मुस्लीम बांधवानी स्वधर्म रक्षणासाठी इंग्रजांविरूद्ध लढण्याचे ठरविले. धर्म रक्षणासाठी प्राण देऊ अशा शपथा ते घेऊ लागले.आणि त्यातून च त्यांनी १८५७ ची स्वधर्म रक्षणासाठी महान क्रांती घडवून आणली. [८]

सावरकरांच्या मते, अशा या स्वधर्म रक्षणाच्या स्फोटक परिस्थितीत आगीत तेल ओतण्यासाठी इंग्रजांनी भारतीय लष्करात चरबीयुक्त, नवीन काडतूसे वापरण्याचा आदेश दिला. अर्थात या नवीन काडतूसांचा प्रवेश

१८५७ पूर्वीच भारतात न कळत झाला होता. हिंदु-मुस्लीम सैनिकांच्या धार्मिक भावनांना कस्पटाप्रमाणे मानणाऱ्या इंग्रज सरकारने इंग्लंडमध्ये गाईची व डुकराची चरबी लावलेली काडतूसे भारतात आणून न कळत त्यांना वाटविले होते. या फसवणुकीचे कपट उघड होईपर्यंत काडतूसांना वाटेल ती चरबी लावण्याची व्यवस्था केली होती. परंतु चरबीची ही बातमी १८५७ मध्ये उघडकीस आली. त्यामुळे देशातील सर्व हिंदु-मुस्लीम शिपायांनी आपल्या प्राणप्रिय स्वधर्म रक्षणासाठी १८५७ मध्ये इंग्रजांविरूध्द क्रांती करावयाचे ठरविले. [१]

अशा प्रकारे वरील सर्व कारणामुळे देशातील सर्व हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी, शिपायांनी आणि संस्थानिकांनी स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी १८५७ मध्ये इंग्रजांविरूध्द महान क्रांती घडवून आणली.

ब) <u>अठराशे सत्तावनच्या क्रांतीयुध्दाचे स्वरूप :</u>

स्वा. सावरकरांच्या मते, १८५७ ची क्रांती ही केवळ शिपायांचे बंड नव्हते, तर ती स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी, हिंदी सैनिकांनी व संस्थानिकांनी इंग्रजांविरूध्द घडवून आणलेली राष्ट्रीय स्वातंत्र्याचे पहिले महान युध्द होय. क्रांतीचा पायाभूत घटक सैनिक असल्याने क्रांतीची सुरूवात हिंदी सैनिकांनीच केली असली तरी या क्रांतीत प्रत्यक्ष जनता आणि संस्थानिक सहभागी झालेहोते. म्हणून ही क्रांती राष्ट्रीय स्वातंत्र्याचा महान संग्राम होता.

दिल्ली स्वतंत्र झाल्याची बातमी ऐकताच अल्पकालातच या क्रांतीचा वणवा उत्तर भारतातील अनेक प्रदेशात पसरला आणि त्यास व्यापक जन-

क्रांतीचे स्वरूप प्राप्त झाले. अलिगड, नसिराबाद, रोहिलखंड, बुंदेलखंड, सागर जिल्हा आणि नर्मदेचा परिसर या सर्व प्रदेशात स्वधर्म व स्वराज्यासाठी एकाच वेळी इंग्रजांविरूद्द क्रांती झाली. बिहारच्या पाटणा विभागातील अनेक जिल्हे, आग्रा, अलाहाबाद, कानपूर, झांशी, अयोध्या इत्यादी ठिकाणी हिंदी सैनिकांनी व जनतेने एकाच वेळी क्रांती करून इंग्रजांची मगरमिठी तोडून टाकली. नानासाहेब पेशवे, अयोध्येची बेगम, झांशीची राणी लक्ष्मीबाई, बरेलीचे खान बहादुरखान, अहमदशाहा, कुंवरसिंह, तात्या टोपे इत्यादींनी या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या क्रांतीचे नेतृत्व केले. या प्रदेशातील प्रत्येक पलटणीतील हिंदी सैनिकांनी आणि हिंदु-मुस्लीम देशबंधूनी स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी इंग्रजांविरूद्द क्रांतीयुद्द पुकारले, आणि बेहोशीत घोषणा केली, "चलो दिल्ली" त्यामुळे या क्रांतीला राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्दाचे भव्य स्वरूप प्राप्त झाले. यावेळी "भारत हा आपला सर्वांचा देश आहे व आपण सर्वजण बंधूबंधू आहोत" अशी घोषणा करीत हिंदी सैनिक व हिंदु-मुस्लिम देशबांधवांनी या क्रांतीयुद्दात भाग घेतला. देशात सर्वत्र सुरू झालेली ही राजकीय क्रांती एकाच सर्वश्रेष्ठ सत्तेखाली व एकाच निशाणाखाली सुरु होती. त्यांच्या भावनात्मक आणि राजकीय निष्ठेचे केंद्रस्थान बादशाहा हेच होते.

ज्या वेगाने क्रांती वाढत होती व ज्या प्रांतात ती पसरत गेली त्या भागात क्रांतीला सामान्य हिंदी जनतेचा मोठा पाठींबा होता. मीरत आणि अलिगड या ठिकाणी हिंदी सैनिकांना जनतेनेच क्रांतीस प्रवृत्त केले. मिळेल ते शस्त्र घेऊन "मारो फिरंगीको" अशा घोषणा देत त्यांनी हिंदी सैनिकाबरोबर क्रांतीत भाग घेतला. ज्यांना इंग्रजांबरोबर सशस्त्र प्रतिकार करता आला नाही त्यांनी इंग्रजांशी असहकार सुरू केला. जनरल हॅवलॉक

याला सैन्य नदीपार करण्यासाठी नावाडी मिळाले नाहीत. कानपूरला ज्या मंजूरांना बळजबरीने कामावर ठेवले होते ते मजूर रातोरात कॅम्पमधून पळून गेले. अॅन्सनची फौज दिल्लीकडे जेव्हा पायी गेली तेव्हा पेठीवाले, व्यापारी, ठेकेदार, मजूर, सर्व वर्गाचे हिंदी लोक त्याच्याशी संबंध न येऊ देण्याचा प्रयत्न करीत. परकीय राजवटीच्या शृंखला तोडण्यासाठी पराक्रमाची शर्थ करणाऱ्या हिंदी सैनिकांना व त्यांच्या क्रांतीकारक नेत्यांना हिंदी जनतेने शक्य तितका पाठिंबा दिला. [१०]

क्रांतीच्या काळात हिंदी लोक धर्मभेद विसरून एकत्र झाले होते. हिंदु-मुस्लीम देशबांधवात स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी जी सहकार्याची, परस्पर विश्वासाची, बंधुत्वाची भावना निर्माण झाली होती तीच या महान क्रांतीचे राष्ट्रीय स्वरूप सिध्द करीत आहे. धर्माधर्मात फुट पाडून त्यांचेवर राज्य करण्याचे जुने धोरण अंमलात आणून ही आणीबाणीची वेळ पार पडेल अशी इंग्रजांना आशा होती. परंतु इंग्रजांना यात यश आले नाही. आचिसनने कबूल केले की, या वेळी आम्हाला हिंदु-विरूध्द, मुसलमानांना लढविता आले नाही. स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी इंग्रज-विरूध्द क्रांती करण्यासाठी ही एकजूट दोन्ही धर्मातील लोकांना हवी होती. एकमेकांची अडचण समजावून घेऊन एकमेकास मदत करण्यास, शांतपणाने वागण्यास व एकमेकांचा आदर राखण्यास हिंदी सैन्यातील दोन्ही धर्माचे नेते उत्सुक होते. त्यामुळेच इंग्रजांचा नेहमीचा फुटीचा डाव यावेळी यशस्वी झाला नाही.

## बादशहाचे आवाहन :

या महान क्रांतीच्या काळात बहादुरशाहा हा भारताचा बादशहा आहे अशी द्वाही फिरविण्यात आली. त्याबरोबर त्याने देशातील हिंदुच्या

भावनांचा आदर राखण्यासाठी गोहत्तेस बंदी केली. हिंदु व मुसलमान ही भारतभूमीची लेकरे आहेत. तेव्हा आपल्या भूमातेवर आलेले संकट दूर करण्यासाठी या परकीय सत्तेचा नाश करावा. यासाठी बादशाहाने एक सार्वजनिक जाहीरनामा काढला. त्यात भारतीयांना आवाहन करण्यात आले की, "सर्व साधने व मार्ग वापरून या कपटी इंग्रजांना भारताबाहेर हाकलून द्यावे अशी माझी तीव्र इच्छा आहे, माझी अशीही उत्कट इच्छा आहे की, सर्व भारत स्वतंत्र व्हावा.... इंग्रज येथून गेल्यानंतर भारतावर राज्य करण्याची मला इच्छा राहिलेली नाही, आपल्या शत्रूला घालविण्यासाठी आपण सर्व भारतीय राजांनी तलवारी उपसल्या, तर भारत स्वतंत्र झाल्यावर मी माझे शाही अधिकार सोडून देऊन भारतातील राजांच्या इच्छेनुसार निवडलेल्या मंडळाच्या हाती सत्ता सुपूर्द करीन. तेव्हा प्रत्येकाने लक्षात घ्यावे की, आपली ही क्रांती केवळ स्वधर्म रक्षणासाठीच आहे, दुसरे कोणतेही आमीष त्यामागे नाही. म्हणून आपल्या प्राचीन धर्माचे रक्षण करण्यासाठी आमच्याशी सर्वांनी सहकार्य करावे. सार्वजनिक हितासाठी लोकांनी स्वार्थाला तिलांजली द्यावयाचे ठरविले तर त्या आपल्या पवित्र भूमीवर एकही इंग्रज मनुष्य राहू शकणार नाही. तेव्हा आपल्या धार्मिक कर्तव्य भावनेने प्रेरीत होऊन सर्वांनी स्वराज्य रक्षणासाठी या क्रांती युध्दात भाग घ्यावा." [११]

सावरकरांच्या मते, बादशाहाच्या या सार्वजनिक जाहीरनाम्याचे निरिक्षण करता असे दिसून येते की, भारत स्वतंत्र झाल्यानंतर बादशाहा स्वत: शाही अधिकाराचा त्याग करण्यास व राजांनी निवडलेल्या मंडळाच्या हाती सत्ता सुपूर्द करण्यास तयार होता. बादशाहाने ही क्रांती यशस्वी व्हावी म्हणून दिल्लीचे तीन नागरिक व शिपायांचे तीन प्रतिनिधी अशा सहा जणांच्या प्रतिनिधी मंडळाने कारभार संघटित रीतीने व एकवाक्यतेने

करावा असे ठरविले. त्यामुळे या क्रांतीच्या काळात दिल्लीच्या बादशहाने काही प्रमाणात लोकांच्या हातात सत्ता सुपूर्द करण्याचे ठरविले. याचा अर्थ क्रांतीनंतर भारतात लोकशाही स्थापन करण्यास त्याचा पाठिंबा असलेला दिसून येतो. त्यामुळे या क्रांतीच्या सर्व हिंदु-मुस्लीम नेत्यांनी स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी बादशहांशी निष्ठा प्रकट केली. नानासाहेब पेशवे यांनी परंपरागत आलेल्या भगव्या निशाणाबरोबरच तारांकित ध्वज फडकविला. देशातील सर्व हिंदु-मुस्लीम देशबांधव स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी खांद्याला खांदा लावून इंग्रजांविरुद्ध लढले. त्यांनी एकत्र रक्त सांडले. या पहिल्या स्वातंत्र्य युद्धात सर्व धर्मभेद लोप पावले. त्यामुळे सावरकरांच्या मते, १८५७ ची क्रांती ही शिपायांचे बंड नाही तर तो राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पहिला स्वातंत्र्य लढा होय.

३) १८५७ च्या क्रांतियुद्धामागील वैचारिक प्रेरणा :

सावरकरांच्या मते, १८५७ च्या क्रांतियुद्धामागे भारतीयांना स्वधर्म व स्वराज्य रक्षणाचीच वैचारिक प्रेरणा मिळालेली दिसून येते. इंग्रज लोक भारतात आले तेव्हापासून त्यांनी भारतीयांचा स्वधर्म व स्वराज्य बुडविण्याचा हेतूपूर्वक प्रयत्न चालविला होता. म्हणून भारतीयांनी आपल्या स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी सर्वांनी एकत्र येऊन इंग्रजांविरुद्ध क्रांतियुद्ध करण्याचे ठरविले.

आपल्या देशाचा सर्वनाश करणाऱ्या इंग्रजांचा सूड घेण्यासाठी नानासाहेबांनी इंग्रजांशी क्रांतियुद्ध करण्याचे ठरविले. देशातील सर्व संस्थानिकांनी, हिंदु-मुस्लीम देश बांधवांनी आणि हिंदी सैनिकांनी एकत्र येऊन इंग्रजांविरुद्ध स्वधर्म व स्वराज्य रक्षणाची क्रांती करावयाची, आणि

देश ताब्यात आल्यानंतर देशातील सर्व सत्ताधिश संस्थानिक राजे-महाराजांची एक संघटीत अशी मध्यवर्ती सत्ता स्थापन करावयाची अशी त्यांनी योजना आखली. क्रांतिसाठी भारतीयांत मनपरिवर्तन व शरीर परिवर्तन करण्यासाठी त्यांनी एक गुप्त संघटना स्थापन केली. या संस्थे-मार्फत स्वधर्म व स्वराज्य रक्षण क्रांतीसाठी मनपरिवर्तन व शरीरपरिवर्तन घडवून आणण्यासाठी नानासाहेबांनी आपले दूत देशातील सर्व संस्थानात पाठविले. इंग्रज सरकार संस्थानांपासून संस्थाने कशी खालसा करीत आहे व त्यामुळे आपला संपूर्ण देश परतंत्र बनणार ही वास्तवस्थिती दूत संस्था-निकांना कथन करु लागले. तसेच इंग्रज राजवटीत आपल्या स्वधर्माची व स्वराज्याची पाय मल्ली कशी होत आहे याचे वर्णन करुन, इंग्रजांचा सूड घेण्यासाठी आपण सर्वांनी मिळून स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी क्रांती करावी असा ते शेवटी निरोप देत. त्यामुळे देशातील सर्व संस्थानिकांनी स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी इंग्रजांविरुद्द, राजकीय क्रांती करण्यासाठी, आपआपले पंडीत, मौलवी, राजकीय संन्याशी इत्यादींना क्रांतीचा गुप्त प्रचार करण्यासाठी देशाच्या वेगवेगळया भागात पाठवून दिले. इंग्रज सत्तेत आपल्या प्राणप्रिय स्वधर्माची व स्वराज्याची पायमल्ली कशी होत आहे, आपलीच तलवार आपल्याच पोटात कशी भोसकली जात आहे याचे स्पष्ट व मार्मिक वर्णन त्यांच्याकडून जनतेला सांगण्यात येऊ लागले, आपण सर्व देशबंधू एक होऊ आणि या मुठभर कपटी इंग्रजांचा धुव्वा उडवून देऊ, अशी क्रांतीची चेतना ते हिंदी जनतेत करु लागले. त्यामुळे संपूर्ण देशात स्वधर्म व स्वराज्य रक्षणाच्या क्रांतीचे क्रांतीमय वातावरण निर्माण होऊ लागले.

अशाच परिस्थितीत दिल्लीच्या बादशाहाने राजकीय क्रांतीचा एक सार्वजनिक जाहीरनामा काढला, त्यात सर्व भारतीयांना क्रांतीचे आवाहन करताना म्हटले होते की, "सर्वांना हे माहीत आहे की, सध्या विश्वास घातकी

आणि धर्मद्रोही इंग्रजांच्या जुलमाखाली देशातील हिंदु व मुसलमान रयत चिरडली जात आहे, तेव्हा वृध्द व तरुण, लहान व थोर, सुशिक्षित व अशिक्षित, रयत व लष्कर अशा सर्वांनी या इंग्रज काफीर लोकांच्या ताब्यातून मुक्त होण्यासाठी या क्रांतीयुध्दाच्या रणांगणात उडी घ्यावी.[१२]

या जाहीरनाम्याचे उतारे सर्व हिंदी वर्तमानपत्रांतून प्रसिध्द झाले. तसेच पंडीत, मौलवी, फकीर, संन्याशी, उपदेशक, शिक्षक, वैद्य, तमासगीर इत्यादींनी "स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी इंग्रजांविरुध्द राजकीय क्रांती करा" असा गुप्त प्रचार हिंदी जनतेत केला. त्यामुळे दिल्ली व देशाच्या इतर भागात क्रांतीची लाट पसरली.

सत्तावनच्या जानेवारी महिन्यात मद्रासमधून क्रांतीचा एक सार्वजनिक जाहीरनामा प्रसिध्द झाला, तो असा, "हे देशबंधूनो व धर्मनिष्ठानों, उठा ! बदमाश इंग्रजांनी न्यायाच्या सर्व तत्वांना पायदळी तुडविलेले आहे, त्यांनी आपले स्वराज्य लुबाडून घेतले आहे, व आपल्या स्वराज्याला धुळीस मिळविण्याचा त्यांचा दुष्ट हेतू आहे, इंग्रजांच्या या भयंकर जुलमातून आपल्या देशाची मुक्तता करण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे त्यांच्याविरुध्द प्रचंड युध्द संग्राम हा होय, या युध्दात जे रणांगणात मरण पावतील ते आपल्या देशाचे हुतात्मे होतील, जे स्वधर्म व स्वराज्यासाठी लढतील व मरतील त्या शूर हुतात्म्यांना स्वर्गाची दारे उघडतील, व जे भ्याड व देशद्रोही अधम ह्या राष्ट्रकार्यापासून परावृत्त होतील ते नरकात जातील ! देश बंधूहो, यांतून तुम्ही कोणते पत्करणार ? त्यामुळे या जाहीरनाम्यातूनही हिंदी जनतेला क्रांतीची प्रेरणा मिळाली.

सर्वसामान्य जनतेने क्रांतीत भाग घ्यावा म्हणून अगदी साध्या आणि सोप्या भाषेत तमाशे आणि किर्तने यामधूनही क्रांतीचा प्रचार चालू होता.

स्त्रियामध्ये प्रचार करण्यासाठी वैदू, बहुरूपी आणि जादूटोणा करणाऱ्या व जोतिष सांगणाऱ्या त्यांच्या भटक्या बायका यांच्याकडून क्रांतीचा प्रचार करण्यात येऊ लागला. हे बहुरूपी इंग्रजी सत्तेचा नाश लौकरच होणार आहे असे भविष्य वर्तवीत व गुलामगिरीच्या चेटकावर प्रत्यक्ष क्रांती हाच उपाय सुचवीत. अशा रीतीने तीर्थक्षेत्रात, मंदीरात, उत्सव यात्राप्रसंगी हिंदी सैनिक, जनता आणि स्त्रिया या सर्वांमध्ये नाटके, तमाशे, किर्तने करून स्वधर्म व स्वराज्य रक्षण क्रांतीचा प्रचार केला जात होता. त्यामुळे हिंदी लोकांत इंग्रजांविरुध्द स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी क्रांती करण्याची वैचारिक भावना तयार झाली.

याच सुमाराला भावी आशेचा तारा चमकावा त्याप्रमाणे सर्व देशभर एक भविष्यवाणी लोकांमध्ये पसरली की, "इंग्रजी राज्य स्थापन झाल्यापासून बरोबर शंभर वर्षांनी त्यांचे भारतावरील राज्य बुडणार" त्यामुळे हिंदी लोकांत स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी राजकीय क्रांतीचे चैतन्य वाटू लागले. हिंदी सैनिकांमध्ये असंतोष चेतविण्याचे जे लोक कार्य करीत होते त्यांनी जाहीर केले की, "जुलमी इंग्रज राजवटीचा अंत जवळ आला आहे. .... रक्ताचे पाट वाहतील, अनेक मुंडकी धडावेगळी होती, आजपर्यंतच्या अन्यायांचा सूड घेतला जाईल आणि कपटी इंग्रजांना साता समुद्रापलीकडे घालवून दिले जाईल." त्यामुळे हिंदी सैनिकांत क्रांतीची प्रेरणा निर्माण झाली. हिंदी सैनिक गंगेचे पाणी हातांत घेऊन किंवा कुराणावर हात ठेवून, "जीवात जीव असेपर्यंत इंग्रज सत्तेचा चुराडा करण्याचे ध्येय ठेवून वागू" अशा प्रतिज्ञा घेऊ लागले. [१३]

हिंदी लोकांनी व सैनिकांनी स्वधर्म व स्वराज्य रक्षणाच्या राजकीय क्रांतीस प्रवृत्त व्हावे म्हणून "रक्त कमळ" फुलाचा सांकेतिक चिन्ह

म्हणून उपयोग करण्यात येऊ लागला. हे "रक्त कमळ" म्हणजे "स्वधर्म व स्वराज्य" क्रांतीची अंतिम राजमुद्राच होय. बंगालमध्ये हिंदी शिपाई आणि शेतकरी राजकीय क्रांतीने प्रोत्साहीत होऊन दोघेही क्रांतीची एकच गोष्ट बोलताना आढळून येत की, "सब कुच्छ लाल होगा है !" (सगळीकडे आता लाल व्हावयाचे आहे) त्यामुळे देशातील हिंदी लोकांत व सैनिकांत अन्यायी इंग्रज सत्तेविरूध्द क्रांतीचे वातावरण तयार झाले. जो तो कपटी इंग्रजांचे राज्य बुडणार या भविष्यकाळाचा वर्तमान काळ करण्यासाठी सज्ज होऊ लागला. अशा क्रांतीमय वातावरणातच लोकांना क्रांतीची प्रेरणा देणारे क्रांतीकारक जाहीरनामे लखनौतून रोज प्रसिध्द होऊ लागले. त्यात "सर्व हिंदी देशबंधूंनी एकदम उठून अन्यायी इंग्रज सत्तेचा नाश करून भारताचे राज्य परत घ्यावे" असा उपदेश अत्यंत ज्वालाग्राही भाषेत केला जात होता.

अशा प्रकारे स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी हिंदी लोकांत क्रांतीची वैचारिक प्रेरणा निर्माण होऊन संपूर्ण देशात अन्यायी इंग्रजांविरूध्द क्रांतीचे वातावरण तयार झाले. क्रांतीचा मुख्य आधार हिंदी सैन्य असल्याने सैनि-कांनी सर्व देशभर एकाच दिवशी इंग्रजांवर हल्ला करावा असे ठरले. क्रांतीच्या सिध्दतेसाठी नानासाहेबांनी दिल्ली, लखनौ, जगदीशपूर, काल्पी इत्यादी क्रांती केंद्रांना भेटी दिल्या. उठावणीचा दिवस निश्चित करणे हाच या भेटीचा उद्देश होता.

त्या उठावणीच्या दिवशी सर्वांनी क्रांतीत भाग घेण्यास पुढे यावे म्हणून एकजात सर्वांना संदेश देण्यासाठी प्रचारकांची एक नवीन तुकडी कामाला लागली होती. ती म्हणजे चपात्यांची ! या चपात्या साधारणतः गव्हा-च्या पिठापासून केलेल्या असत. त्यांच्यावर काहीही लिहिलेले नसे. तरीसुध्दा राजकीय क्रांतीचा जळता संदेश खाणाऱ्या प्रत्येकाच्या मनांत त्या पेटवून देत.

प्रत्येक गावच्या चौकीदाराजवळ ही "चपाती" असे. तीतील एक तुकडा आपण मोडून खाऊन बाकीचा "प्रसाद" म्हणून तो सर्व गावाला वाटी. पुन: तशाच आणखी काही चपात्या बनवून दुसऱ्या गावाला पाठवून देण्यात येत. तेथील चौकीदार त्या आलेल्या चपात्या आपल्या गावाला वाटून पुन: तसल्याच दुसऱ्या चपात्या बनवून पुढच्या गावाला पाठवून देत असे. अशा रीतीने खेडया-खेडयातून आणि गावागांवांतून धावून क्रांतीची ही जळती मशाला संबंध देश राजकीय क्रांतीने पेटवून देत निघाली. [१४]

हिंदू - मुसलमान ऐक्य :

स्वा. सावरकरांच्या मते, १८५७ ची क्रांती ही भारतातील हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी इंग्रजांविरूद्ध घडवून आणिली. क्रांतीत हिंदु-मुस्लीम लोक बंधूत्वाच्या व ऐक्याच्या भावनेने इंग्रजांविरूद्ध लढले. भारतात पाऊल टाकल्यापासून येथील हिंदु-मुस्लीम लोकांच्या मनांतील धर्मनिष्ठा आणि स्वदेशभक्ती नष्ट करून टाकण्याचा इंग्रजांनी पध्दतशीर प्रयत्न चालविला होता. लोकांच्या धार्मिक आणि राष्ट्रीय भावना चिरडून टाकल्या की तिचे स्वत्व मरते, मग अशा मेलेल्या राष्ट्रावर राज्य करणे आपल्याला फार सोपे जाईल, असा इंग्रजांचा दुष्ट दृष्टिकोण होता.

पारतंत्र्याच्या वातावरणात खरा धर्म मुळी जिवंत राहू शकत नाही, ही जाणीव त्या काळात हिंदु-मुस्लीम लोकांना हळूहळू होऊ लागली. पारतंत्र्यात पिचणाऱ्या किडयांना कसला आला आहे धर्म ? धर्माची पहिली खूण म्हणजे स्वतंत्र राष्ट्राचा स्वतंत्र मनुष्य होणे हीच होय. स्वातंत्र्याचा सर्वोच्च विकास हाच परमेश्वर ! पारतंत्र्याच्या नरकात किडयामुंग्याप्रमाणे

जगण्यापेक्षा आपल्या माणूसकीला शोभेल असा मरणाचा मार्ग पत्करलेला बरा असे हिंदु-मुस्लीम लोकांना वाटू लागले.

या क्रांतीच्या काळात भारत हा आपणा दोघांचाही देश आहे. अशीच भावना हिंदु-मुस्लीम लोकांची होती. मुसलमानांची सत्ता लयाला गेली होती, म्हणून आपण राज्यकर्ते आणि हिंदु प्रजा गुलाम ही भावना त्यांच्या मनांत त्यावेळी नव्हती. या काळात हिंदु - मुसलमान लोक आपा-पसातले परंपरागत वैर विसरून स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी परस्परांना भाऊ-भाऊ म्हणून मानू लागले. म्हणूनच या क्रांतीत नानासाहेब पेशवे, कुंवरसिंह, बहादुरशाहा, मौलवी अहमदशाहा, खान बहादुरखान, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे हे सर्व हिंदु-मुसलमान नेते एका स्वदेशाच्या झेंड्या-खाली एकत्र आले. भारतातील कपटी इंग्रजांची सत्ता नष्ट करणे आणि स्वदेशाला स्वतंत्र करणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते. म्हणून स्वदेश स्वातंत्र्या-करिता प्रथम सर्वांनी खांद्याला खांदा लावून इंग्रजांविरूद्द लढावयाचे व स्वातंत्र्य मिळताच सर्वांनी मिळून सर्वांचे असे एक संयुक्त हिंदी राज्य स्थापन करावयाचे हीच दृष्टी त्यावेळी त्यांची होती. [१५]

सावरकरांच्या मते, इंग्रज भारतात आल्यापासूनच त्यांनी कपटी, विश्वासघातकी धोरणांचा स्वीकार केला. साम्राज्यविस्तारासाठी भारतातील संस्थाने खालसा करणे, भारतीयांचा धर्म हेतूपूर्वक बुडविण्याचा प्रयत्न करणे इत्यादी कृत्ये करण्यास सुरुवात केली. त्यामुळे भारतातील सर्व हिंदु-मुस्लीम संस्थानिकांना, हिंदी सैनिकांना व हिंदु-मुस्लीम लोकांना असे वाटू लागले की, इंग्रज लोक आपला स्वधर्म व स्वराज्य हेतूपर्वक नष्ट करु पाहत आहेत. तेव्हा आपल्या प्राणप्रिय स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी इंग्रजांविरूद्द आपण सर्वांनी मिळून क्रांतीयुद्द केले पाहिजे. [१६]

क्रांतीचा मुख्य आधार सैनिक असल्याने, हिंदु-मुस्लीम सैनिकांनी स्वधर्म व स्वराज्यासाठी मीरत आणि दिल्ली येथे इंग्रजांविरूद्द क्रांती करून दिल्लीला इंग्रजांच्या ताब्यातून मुक्त केले आणि दिल्लीत स्वातंत्र्याचे निशाण फडकविले अर्थात या काळात मीरतच्या बायकांपासून ते दिल्लीच्या बादशाहापर्यंत हिंदु - मुस्लीम बांधवांच्या अंत:करणात स्वातंत्र्याची व स्वधर्मरक्षणाची तीव्र इच्छा उत्पन्न झाल्याने व त्या इच्छेला गुप्तसंघटनेकडून अगोदरच व्यवस्थित रूप मिळाल्याने एक पाच दिवसांच्या आत भारताच्या इतिहास प्रसिध्द राजधानीत स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा केली. या काळात दिल्लीमध्ये इंग्रज सत्तेचे एकही चिन्ह अवशेष म्हणून राखले नाही. इंग्रज सत्तेचा सूड म्हणून इंग्रजांच्या निशाणाचे तुकडे तुकडे करून रस्तोरस्ती तुडविले. हिंदु-मुस्लीम सैनिकांनी व लोकांनी इंग्रजांची घरे, बंगले, कार्यालये, चर्च पेटवून दिले. तसेच दिसेल त्या इंग्रजांना, त्यांच्या बायका पोरांना, अधिकाऱ्यांना ठार करून यमसदनास धाडले. या क्रांतीच्या काळात कोणीही देशद्रोहीपणा केला नाही. पुरूष स्त्रिया, श्रीमंत-गरीब, तरूण-वृध्द, सैनिक-नागरिक, मौलवी-पंडीत, हिंदु-मुसलमान अशा सर्वांनीच स्वदेश निशाणाखाली आपआपली शस्त्रास्त्रे उपसून इंग्रजांवर हल्ला चढविला, आणि इंग्रज सत्तेचा नायनाट करण्यास सुरूवात केली. त्यामुळे या क्रांतीकाळात हिंदु-मुस्लीम देशबंधुत विलक्षण देशप्रेम व स्वातंत्र्यप्रेम ओसंडून वाहू लागले. हिंदु-मुस्लीमांचे परंपरागत असलेले वैर संपले अशी द्वाही फिरविण्यात आली. भारत हा आपला देश आहे व आपण सर्व भाऊ-भाऊ आहेत अशी घोषणा करण्यात आली. त्यामुळे या काळात हिंदु-मुस्लीम यांच्यात स्वदेशासाठी ऐक्य निर्माण झाले. [१७]

दिल्लीच्या बादशाहाने घोषीत केले की, ही क्रांती कपटी इंग्रजांविरूद्द आहे. तेव्हा इंग्रज सत्तेचा नाश करण्यासाठी देशातील सर्व हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी या पवित्र कार्यात सहभागी व्हावे. बादशाहाच्या या आवाहनाला

हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी प्रतिसाद दिला. इंग्रजांना देशातून हाकलून देणे हाच त्यांचा अंतिम उद्देश होता. त्यामुळे हिंदु-मुस्लीम बांधव परस्परांना सहकार्य करु लागले. एकमेकांचा आदर राखू लागले. क्रांतीचा हिंदु-मुस्लीम नेत्यांची एकमेकांना सहकार्याचे व एकी टिकविण्याचे आश्वासन दिले. या क्रांतीच्यावेळी दिल्ली शहरात काही माथेफिरु मुसलमानांनी जिहादच्या नावाखाली हिंदुचा अपमान करण्यासाठी त्यांचेविरुध्द जिहादची घोषणा केली. तेव्हा बादशहाने आपल्या लवाजम्यासह हत्तीवर बसून सर्व शहरातून एक भव्य मिरवणूक काढून असे जाहीर केले की, "आपला हा जिहाद केवळ परकीय इंग्रजांविरुध्द आहे. हिंदुविरुध्द नाही. जो कोणी गाईचा वध करणारा आढळेल त्याला तोफेच्या तोंडी देण्यात येईल किंवा त्याचा हात छाटला जाईल." [१७]

बरेलीच्या खान बहादुरखानांनी रोहिलखंडात हिंदु-मुस्लीमात परस्परात सहकार्य, ऐक्य घडवून आणण्यासाठी व इंग्रज सत्तेचा नाश करण्यासाठी खालील राजकीय जाहीरनामा प्रसिध्द केला.

"भारत देशातील रहिवाशांनो, स्वराज्याची पर्वणीतुम्हांस चालून आलेली आहे, तिचा तुम्ही स्वीकार करणार की अनादर करणार ? या अपूर्व संधीचा फायदा होणार की तिला हातातून सोडून देणार ? हिंदू बांधवहो व मुसलमान बंधूहो, हे लक्षात ठेवा की, जर आपल्या भारत देशात ह्या कपटी इंग्रजांना तुम्ही राहू दिलेत, तर तुमच्या देशाचा नायनाट व तुमच्या धर्माचा उच्छेद केल्याशिवाय ते राहणार नाहीत, इंग्रजांच्या कपटी व फसवेगिरीमुळे आजपर्यंत भारतीय लोकांनी आपली मान आपल्याच तलवारीने कापली आहे. म्हणून ती गृहभेदाची चूक आपणांस आता सुधारली पाहिजे,

हिंदु विरूद्द मुसलमान उठविणे हा कपटीपणाचा प्रयोग इंग्रज लोक आताही करू पाहतील, तेव्हा देशबंधूनो इंग्रजांच्या या फासात तुम्ही अडकू नका, इंग्रज लोक आपली वचने व आश्वासने कधीही पाळत नाहीत, भूलथापा देऊन फस-विणा-या भामटेगीरीत ते वस्ताद आहेत, धर्मा-धर्मात फुट पाडण्याचे कृत्य आजपर्यंत करीत आलेले आहेत. त्यांनी दत्तक वारसाचे हक्क झुगारून दिले, येथील राजांचे प्रदेश व राज्ये गिळंकृत केली आहेत, नागपूर लखनौ इत्यादी कितीतरी राज्ये त्यांनी बुडविली आहेत, हिंदु व मुसलमान या दोघांनाही त्यांनी पायाखाली तुडविले. मुसलमानानो, तुम्हाला कुराणाची पर्वा असेल व हिंदुनो तुम्हाला गोमातेची पर्वा असेल तर आता आपसांतील भेदभाव विसरून जाऊन या क्रांतीयुद्दात सर्वजण सहभागी व्हा. एका ध्वजाखाली लढत लढत रणांगणात उडी घ्या व भारतातील इंग्रजांचे नाव रक्ताच्या पाटांनी धवून टाका. भारतातून इंग्रजांचा नायनाट करण्यासाठी या धर्मयुद्दात जो स्वत: लढेल किंवा दुस-यास लढण्यासाठी मदत करील तो ऐहिक व पारमार्थिक स्वातंत्र्यप्रत पावेल. परंतु जर कोणी ह्या स्वदेश युद्दाच्या विरूद्द जाईल तर तो स्वत:च्याच मस्तकावर स्वत:च आघात करून आत्महत्येचा धनी होईल.[१८]

या जाहीरनाम्याच्या आगेदरच हिंदु-मुस्लीम देशबांधवात स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी परस्परांत बंधुत्वाची, सहकार्याची ऐक्याची, देश-प्रेमाची व देश स्वातंत्र्याची भावना वृद्दिगत झालेली होती. अशाच परि-स्थितीत हा जाहीरनामा प्रसिद्द झाल्याने या भावनेला अधिकच बळकटी आली. त्यामुळे या क्रांतीच्या काळात देशास सर्वत्र क्रांतीचे हिंदु-मुस्लीम नेते, सैनिक व लोक स्वधर्म व स्वराज्यासाठी "मौरो फिरंगींको" अशी घोषणा करीत. इंग्रजांविरूद्द आपले प्राण पणाला लावून लढू लागले. हिंदु-मुस्लीम लोक स्वदेशासाठी मिळेल ते शस्त्र घेऊन इंग्रजांशी लढू लागले. ज्यांना शस्त्र मिळाले नाही. त्यांनी इंग्रजांवर बहि:ष्कार घालून असहकाराचा लढा पुकारला.

त्यामुळे इंग्रजांच्या हालाला पारावार उरला नाही. अलाहाबाद प्रांतात इंग्रजांनी अलाहाबादचा किल्ला जिंकून घेतल्यानंतर त्यांना पुढे जाण्यासाठी कोणीही भारतीयांनी बैलगाडया दिल्या नाहीत. आजारी इंग्रज सैनिकांना डोल्या दिल्या नाहीत, त्यांना औषधे दिली नाही, अन्न दिले नाही. अशाच परिस्थितीत एका व्यक्तिने इंग्रजांना भाकरी दिली तेव्हा, गावक-यांनी त्या भाकरी देणा-याचे दोन्ही हात व नाक कापले. क्रांतीकाळात क्रांतीचे लहान-लहान नेते पकडून देणा-यांस नीळने हजारो रुपयांची बक्षिसे लावली तरी देखील गरीब शेतकरीही ते कृत्य करण्यास तयार झाले नाहीत. कारण हे युध्द तत्वासाठी जुंपलेले होते. अशा प्रकारे हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी या क्रांतीयुध्दात ऐक्य भावनेने इंग्रजांवर सशस्त्र हल्ले करुन तसेच बहि:ष्कार टाकून त्यांना जेरीस आणण्याचा प्रयत्न केला.[१९]

कानपूरमध्येही नानासाहेबांच्या नेतृत्वाखाली हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी इंग्रजांविरुध्द क्रांतीचा लढा उभारला."अन्यायी इंग्रज सत्तेचा सूड घेण्यासाठी आसुसलेल्या हिंदु-मुस्लीम बांधवांनी देशाची स्वतंत्रता तरी मिळवू नाही तर मारीत मारीत मरुन तरी जाऊ" अशी प्रतिज्ञा सर्वांनी मिळून घेतली.

त्यामुळे संपूर्ण देशात स्वधर्म व स्वराज्यासाठी अन्यायी इंग्रज सत्तेचा सूड घेण्यासाठी हिंदु-मुसलमान, ब्राम्हण-शूद, क्षत्रीय-वैश्य, राजे-रंक, स्त्रिया-पुरुष, पंडीत-मौलवी, शिपाई-पोलीस अशा सर्वांनीच मिळून या क्रांतीत भाग घेतला. या महान क्रांतीचे नेतृत्व बादशाहा बहादुरशाहा, नानासाहेब पेशवे, कुंवरसिंह, मौलवी अहमदशाहा, खान बहादुरखान, झांशीची राणी लक्ष्मीबाई, सेनापती तात्या टोपे अशा हिंदु-मुस्लीम नेत्यांनी केले. त्यामुळे या महान क्रांतीत धर्मभेद लोप पावले आणि हिंदु-मुस्लीम बांधवात ऐक्य घडून आले.

१८५७ च्या स्वातंत्र्ययुध्दाच्या पराभवाची कारणे :

स्वा. सावरकरांच्या मते, १८५७ मध्ये भारतीयांनी स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी अन्यायी इंग्रजी राजवटीविरूध्द स्वातंत्र्ययुध्द घडवून आणले. परंतु या स्वातंत्र्ययुध्दात भारतीयांचा पुढील कारणामुळे पराभव झाला.

त्यांच्या मते, भारतीयांची ही स्वातंत्र्य युध्दाची उठावणी पूर्वसंकेतानुसार ठरलेल्या ३१ मे रोजी सर्वत्र एकाच वेळी झाली असती तर भारतीयांचा विजय निश्चित झाला असता. परंतु मीरत व दिल्लीच्या आकस्मित उठावणीमुळे शत्रूला ठरलेल्या वेळेच्या पूर्वीच सावध केले आणि आपल्या इतर ठिकाणाच्या देशबांधवांना त्यांनी मोठया पेचात पाडले. त्यांना क्रांतीच्या तयारीस पुरेसा वेळ न मिळाल्याने अपु-या तयारीने रणांगणात उतरावे लागले. त्यामुळे या क्रांतीत अपयश येऊन त्यांना पराभव झाला.

या क्रांतीयुध्दात नेटिव्ह जर असेच स्तब्ध राहिले असते तर खरोखरच एका दिवसात इंग्रजांची सत्ता झुगारून देता आली असती, परंतु सत्तावन साली तो दिवस उजाडणारा नव्हता. सत्तावन साल ही त्या दिवसाच्या पहाटेची रात्र होती. ज्यांना ती भावी पहाट दिसू लागली ते झोपा टाकून उठले. परंतु ज्यांना ती तत्कालीन रात्रच दिसली ते आपले गुंलामगिरीचे हिसकले गेलेले पांघरून आणखी जवळ घेऊन स्वस्थ झोपी गेले. या झोपाळू लोकांत अगदी कुंभकर्णाचा मान पटकावणारे लोक म्हणजे, पतियाळा, नाभा व झिंद ही तीन संस्थाने होत. ह्या संस्थानांच्या हातात सत्तावनच्या क्रांतीचे तारण किंवा मारण होते. ही संस्थाने दिल्ली व अंबाला ह्यांच्या दरम्यान असल्याने त्यांच्या आधाराशिवाय इंग्रजांची पाठ

बिलकूल सुरक्षित राहणारी नव्हती. ही संस्थाने इतर संस्थानाप्रमाणे जरी नुसती स्तब्ध राहिली असती, तरीही क्रांतीला यश आले असते. परंतु पतियाळा, झिंद व नाभा ह्या तिघांनीही इंग्रजांपेक्षाही जास्त क्रूरतेने सत्तावनच्या राज्यक्रांतीवर घाव घालण्यास जेव्हा आरंभ केला तेंव्हा त्या क्रांतीच्या अवयवांतील संगती क्षणार्धात नष्ट झाली. या संस्थानांनी बादशहांच्या आमंत्रणाचा धिक्कार केला व आमंत्रणासाठी आलेल्या स्वारांना ठार केले. स्वत:च्या खजिन्यातून इंग्रजांना मदत केली. स्वत:चे सैन्य उभारून ज्या प्रदेशातून इंग्रजी सैन्य जाणार होते तो प्रदेश संरक्षण केला. दिल्लीवर इंग्रजांबरोबर ते चालून गेले. क्रांतीयुध्दात या तिन्ही संस्थानांनी इंग्रजांना मदत केल्यामुळे भारतीयांचा पराभव झाला. [२०]

या क्रांतीच्या काळात इंग्रजांनी अमानुष कृत्याद्वारे भारतीयांना इतका धाक बसविला की, भारतीय लोक त्या अमानुष कृत्याला भिऊन क्रांतीतून बाहेर पडले. कारण इंग्रज सैन्य खेडयांतून शिरत तेव्हा त्यांना जो भेटेल त्याला ते एक कापीत तरी नाही तर फाशी देत. फासाचे खांब कमी पडल्याने इंग्रजांनी लोकांना झाडांच्या फांद्यांना टांगून फाशी देण्याचा सपाटा चालविला. खेडीच्या खेडी पेटवून देऊन त्यात खेडयांतील असंख्य निष्पाप लोकांना जाळून ठार करीत. आगीतून जीव वाचविण्यासाठी कोणी बाहेर पडू लागला तर त्यास गोळ्या घालून ठार केले. जात. अशा या इंग्रजांच्या भयंकर अमानुष कृत्याला भिऊन लोकांनी क्रांतीतून आपला सहभाग काढून घेतला. त्यामुळे या क्रांतीयुध्दात क्रांतीपक्षाचा पराभव झाला.

या क्रांतीकाळात नीलने कानपूरच्या रक्षणाकरिता एक नवीनच तोड काढली. ती ही की, तेथील महारांची एक सेना तयार करून तिच्या बंदोबस्तात सर्व शहर सोपवून दिले. शहरातील उच्च जातींविरूध्द अतिशूद्रांना

चढवून देणे, ही तोड अर्थातच उत्तम रीतीने सिध्दीस गेली. मुसलमान व हिंदु यांच्यात फूट पाडता आली नाही, तेव्हा जातीभेदाचे नवेच भूत उभे करण्यात आले व ते यशस्वीही झाले. त्यामुळे या स्वातंत्र्ययुध्दात भारतीयांचा पराभव होण्यास मदत झाली.

सावरकरांच्या मते, प्रत्येक क्रांतीचा प्रारंभ, त्यावेळी नको असलेल्या सत्तेचे निर्बंध तलवारीने तोडून टाकण्यापासूनच होतो. परंतु एकदा का ही सवय अंगवळणी पडली म्हणजे पुढेसुध्दा सर्व नियम व कायदे धाब्यावर बसविण्याचीच प्रवृत्ती बळावते. परकीय सत्तेला उलथून टाकण्यासाठी जे वीर पुढे येतात त्यांना पुढे सर्वच सत्ता, मग ती आपली असली तरी, उलथून टाकावीशी वाटू लागते, आणि त्याचमुळे पुढे क्रांतीतून अराजक जन्माला येऊन कोणाचा पायपोस कोणाच्या पायास नाही अशी स्थिती होते. औषधाकरिता दारु घेणाऱ्यास जसे पुढे दारुचेच व्यसन लागते, त्याप्रमाणे दुष्ट राजसत्तेचे शासन निर्बंध तोडूनच क्रांतीकारक थांबत नाहीत, त्यांना कोणत्याच राजसत्तेचे बंधन नको वाटू लागते. आणि क्रांतीतील याच घातकी विषयामुळे त्या क्रांतीचाच शेवटी नाश होतो. या दृष्टीने ५७ च्या क्रांतीचा पहिला भाग फार यशस्वीपणे पार पाडण्यात आलेला होता. परंतु परकीय सत्तेच्या शृंखला एकदा तोडून टाकल्यावर हिंदी सैनिकांना कोणतेच बंधन नकोसे वाटू लागले. त्यामुळे शिस्तीच्या दृष्टीने सर्वत्र ढिलेपणा आला. वरिष्ठांच्या आज्ञा ते गुंडाळून ठेवू लागले. अशा वेळी सर्वांवर आपल्या पराक्रमाने व बुध्दीने छाप पाडणारा एखादा वीर पुरुष आला असता, तर त्याचे अनुयायी म्हणून सर्वजण एकत्र येऊ शकले असते व ही क्रांती विजयी झाली असती. परंतु असा लोकनायक न लाभल्याने हिंदी सैन्यात बाजारबुणगे लोक अधिक भरले. त्यामुळे या क्रांतीयुध्दात भारतीयांचा पराभव झाला.[२१]

सावरकरांच्या मते या क्रांतीयुध्दात भारतीयांचा पराभव होण्याविषयी वरील तात्कालीक कारणे असली तरी त्या पराभवाचे मुख्य कारण असे दिसते की, ह्या क्रांतीसाठी विघातक भागाची जरी व्यवस्थित आखणी केली होती तरी त्यानंतर उत्पन्न येणाऱ्या परिस्थितीमध्ये कसे वागले पाहिजे याविषयी विधायक आकर्षक व सुव्यवस्थित आखणी केली गेली नाही. अन्यायी इंग्रजी सत्ता उखडून नष्ट रावी यावर सर्वांचे एकमत होते, पण त्यानंतर काय ? पूर्वीचीच ती परस्परविघातक भांडणे, पुन्हा तेच मोंगल, तेच मराठे आणि तीच जुनी भांडणे सुरु होणार. अशा परिस्थितीला कंटाळून वेडाच्या झट-क्यात परकीय शत्रूला आत येण्याची तीच जुनी पध्दत स्वीकारावयाची असेल, तर आपले रक्त व्यर्थ कशाला सांडावयाचे असे सर्वसाधारण जनतेला वाटू लागले. त्यामुळे क्रांतीचा विघातक भाग तेवढा यशस्वीपणे पार पडला. परंतु नंतर जेव्हा जेव्हा विधातक राजवटीचा प्रश्न उत्पन्न झाला तेव्हा आपा-पसातील मतभेद परस्परांविषयी वाटणारी भीती आणि अविश्वासाचा अभाव हे सर्व दुर्गुण उफाळून आले. क्रांतीनंतर जर लोकांच्या कल्पनेला व विचारांना पटेल असा आकर्षक कार्यक्रम ठेवण्यात आला असता तर, क्रांतीनंतर होणारी स्वातंत्र्यवाढीची विधायक वृत्ती वाढून प्रारंभाप्रमाणेच क्रांतीचा शेवटही यशस्वीपणे सिध्दीस गेला असता.

पूर्ण संहारानंतर निर्मिती चालू होते, दुष्टांच्या नायनाटानंतर चांगली राजवट स्थापन करता येते. हे भारतीयांनी लक्षात ठेवले असते, तर क्रांतीचा विजय झाला असता. नव्या निर्मितीचा विचार तर दुर राहिला, पण ती जनता परकीय राजवटीचा विनाशही पूर्णपणे करु शकली नाही. याचे कारण ह्या देशातून विश्वासघात आणि स्वदेशद्रोह हे दोन दुर्गुण पूर्णांशाने नष्ट झाले नव्हते. त्यामुळे या क्रांतीच्या अपयशाला मुख्यत:

दोनच गोष्टी कारणीभूत ठरल्या. एक म्हणजे पूर्वीच्या कसल्याही प्रकारच्या ओबडधोबड स्वराज्यापेक्षा इंग्रजी राजवट अधिक वाईट आणि हानिकारक आहे हे समजण्याची अक्कल नसलेल्या लोकांनी केलेला स्वदेशबंधूशी विश्वासघात होय. त्यामुळे ह्या पराजयाचे सर्व खापर विश्वासघातकी लोकांच्याच कपाळी फुटते. जर त्यांच्यापुढे स्वच्छ आणि आकर्षक ध्येय वा कार्यक्रम ठेवला असता तर हेच विश्वासघातकी देशभक्त बनले असते. पारतंत्र्याच्या सोनेरी पिंज-यापेक्षा जंगलात असलेले स्वातंत्र्य स्वातंत्र्यच शतपटीने श्रेष्ठ असते. ज्यांना हे स्वातंत्र्याचे तत्व समजले, स्वधर्माकरिता व स्वराज्याकरिता ज्यांनी आपल्या तलवारी उपसल्या आणि जयासाठी नाही पण कर्तव्यबुध्दीने ज्यांनी मरणही पत्करले त्यांची नावे चिरंजीव राहोत.

अपयशाची दुसरी गोष्ट म्हणजे प्रामाणिकपणाचा आणि ख-या देशभक्तीचा अभाव हे होय, त्यामुळेच अन्यायी इंग्रजांच्या बाजूने शीख, गुरखे, हिंदी संस्थानिक आणि हिंदी प्रजा लढली. म्हणून या युध्दात स्वदेशद्रोहामुळे भारतीयांचा पराभव झाला.

सावरकरांच्या मते, १८५७ ची क्रांती म्हणजे भारताच्या ऐक्याच्या, स्वातंत्र्याच्या आणि जनतेच्या जागृतीच्या दिशेने कितपत प्रगती झाली आहे हे पारखून पाहण्याची कसोटीच होती. या क्रांतीच्या अपयशाचा दोष देशातील आळशी आणि स्वार्थी नतद्रष्टांवर येतो. परंतु स्वतःच्या रक्ताने माखलेल्या आपल्या तलवारी घेऊन जे वीर प्रत्यक्ष मृत्यूच्या छातीवर नाचले त्या वीरांना दोष देऊन कोणीही आपल्या जिभा विटाळू नयेत. ते वेडे नव्हते, ते उतावळे नव्हते, पराजयाला ते कारणीभूत झाले नाहीत. त्यांनी तर अन्यायाच्या मस्तकावर पहिला वार केला.

सावरकरांचा १८५७ च्या स्वातंत्र्य लढयावरील ग्रंथ त्यांच्या तत्कालीन विचारसरणीचे उत्तम प्रतिबिंब आहे. हा ग्रंथ लिहिताना त्यांच्यावर मॅझिनीच्या विचारांचा पूर्ण प्रभाव होता. त्यांच्या मते १८५७ ची क्रांती केवळ स्थानिक असंतोषामुळे उद्भवली नव्हती. तर तिच्यामागे स्वराज्य संस्थापनाचा आणि स्वधर्म रक्षणाचा उद्देशहोता. स्वराज्य व स्वधर्म ही दोन्हीही इंग्रजांनी हिरावून घेतली होती. म्हणून या स्वधर्म व स्वराज्य रक्षणाच्या क्रांती लढयामध्ये सर्व भारतीयांनी सर्व भारतीयांनी सर्व जात, धर्म, पंथ विसरून प्राणपणाने भाग घेतला. या स्वातंत्र्य लढयातून जुन्या अगदी प्राथमिक स्तरावर लोकशाही रचना निर्माण होण्याची शक्यता होती. हिंदु व मुसलमान एक होऊन या लढयात लढले. पण भारतीयांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व लष्करी मागासलेपणामुळे त्यांचा पराभव झाला. या क्रांतीला विशिष्ट अशी प्रागतीक अशी वैचारिक दिशा नव्हती. हे ही सावरकर मान्य करतात. तरीही हा लढा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा होता असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. येथे ते धर्माधिष्ठीत हिंदु राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते नसून प्रदेशाधिष्ठित "हिंदी राष्ट्रवादाचे" पुरस्कर्ते होते.

......

## प्रकरण चौथे

## संदर्भ ग्रंथ


१. अंदूरकर त्र्यं.गो. - शत्रूच्या गोटात सावरकर, सुरस ग्रंथमाला, सोलापूर, १९७०, पृ.क्र. ९०.

२. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर, खंड ४, १८५७ चे स्वातंत्र्य-समर, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ. १६.

३. उक्त, - पृ.क्र. २०.

४. उक्त, - पृ.क्र. २३.

५. उक्त, - पृ.क्र. २९.

६. उक्त, - पृ.क्र. ५३.

७. उक्त, - पृ.क्र. ५५.

८. उक्त, - पृ.क्र. ५७.

९. उक्त, - पृ.क्र.५९.

१०. प्रधान ग.प्र. - स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत, साधना प्रकाशन, पुणे, १९८७, पृ.क्र.९.

११. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर खंड ४, १८५७ चे स्वातंत्र-समर, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. २२९.

१२. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर, खंड ४, १८५७ चे स्वातंत्र्य-समर, वीर,सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. ६५.

१३. पटवर्धन वि.वि. - वि.दा. सावरकर, १८५७ चे स्वातंत्र्यसमर, अनुवाद व संक्षेप, आ.२, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७७, पृ.क्र. ४३.

१४. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर, खंड ४, १८५७ चे स्वातंत्र्यसमर, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. ७५.

१५. पटवर्धन वि.वि. - वि.दा. सावरकर, १८५७ चे स्वातंत्र्य-समर, अनुवाद व संक्षेप, आ.२, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७७, पृ.क्र.९.

१६. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर, खंड ४, १८५७ चे स्वातंत्र्य-समर, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. २२९.

१७. उक्त, - पृ.क्र. ९९.

१८. उक्त, - पृ.क्र. १४०.

१९. उक्त, - पृ. १६०.

२०. उक्त, - पृ.क्र. १०४.

२१. उक्त, - पृ.क्र. २८४.

२२. उक्त, - पृ.क्र. ४२३.